महाराष्ट्राची बाराव्या-तेराव्या शतकापर्यंतची स्थिती लक्षात घेता संपूर्ण बहुजन समाज अज्ञानरूपी अंधःकारात चाचपडत जादूटोणा, मंत्र-तंत्र, नवस-सायास, गंडेदोरे, विविध देव-देवतांच्या पूजाअर्चा यात अडकून मानसिकदृष्ट्या अधःपतीत झालेला दिसून येतो.


साहाजिकच माणसाच्या प्रगतीचा एकमेव अडसर म्हणजे अज्ञान आहे; हे लक्षात घेऊन वारकरी, महानुभाव, दत्त, समर्थ, आनंद, सूफी यासारखे संप्रदाय (पंथ) निर्माण झाले. या संप्रदायातील संतांनी, प्रज्ञावंतांनी जनसामान्यांना एका विशिष्ट छत्राखाली आणण्याचा प्रयत्न केला. त्याची विशिष्ट आचारसंहिता, तत्त्वे निश्चित केली आणि महाराष्ट्रात प्रबोधन चळवळ गतिमान केली. भक्तीच्या माध्यमातून अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याचे मार्ग पौराणिक ग्रंथातील दाखले देऊन, बहुजनांचे जगण्याचे संदर्भ लक्षात घेऊन मांडले. ही प्रबोधनाची चळवळ आणि परंपरा कळण्यासाठी 'महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय' हा संदर्भमूल्य असलेला संदर्भग्रंथ निश्चितच अनमोल असा आहे.

मूल्य : ३५०/-
ISBN : 978-93-94622-47-0

प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड सेवापूर्ती गौरवग्रंथ | महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय | संपादक - डॉ. पांडुरंग भोसले डॉ. सचिन रुपनर प्रा. संग्राम गो

प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
सेवापूर्ती गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय



संपादक

डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर

प्रकाशक क्रमांक : २९०

Maharashtratil Bhakti Sampraday

# महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय

संपादक : डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
प्रा. संग्राम गोसावी

प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.

प्रकाशक – श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर–पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२

© प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
'हरिनामवेल', कृषी उत्पन्न बाजार समितीमागे,
मंचर, जि. पुणे – ४१० ५०३
मो. नं. ९७६७२२२७११

मुद्रण : एक्सेल प्रिंटींग प्रेस, पुणे

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

प्रथमावृत्ती : २८ मे, २०२२

अक्षरजुळणी : समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर

ISBN : ९७८–९३–९४६२२–४७–०

किंमत : ३५०/– रु.

टीप : या पुस्तकातील लेखकांच्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

Scanned with CamScanner

# अ नु क्र म


१. संत मेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे / ११

२. संत तुकारामांच्या साहित्यातील समाजविचार
प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड / २१

३. स्त्री संतांची परंपरा : एक भगवी पताका
प्राचार्य डॉ. शिवाजी निवृत्ती मोहिते / २७

४. संत जनाबाईंचे अभंग : स्त्री जीवनाचा उत्कट काव्यमय अविष्कार
प्राचार्य डॉ. शोभा बाळासाहेब इंगवले / ३९

५. आनंद संप्रदाय आणि माणदेशी परंपरा
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी / ४५

६. वारकरी संप्रदाय व आद्यकीर्तनकार संत नामदेव
प्राचार्य डॉ. भगवानसिंह राजपूत/ डॉ. सौ. मनिषा दयाघन पाटील / ५१

७. भक्ती संप्रदायाचे स्वरूप, विशेष व वाटचाल
डॉ. ज्योती परब / ५६

८. भक्ती संप्रदायांचे सामाजिक योगदान
डॉ. सीमा नाईक-गोसावी / ७०

९. महानुभावीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म
डॉ. शीतल कोरडे / ७५

१०. महानुभावीय गद्य वाङ्मय
डॉ. अतुल नारायण चौरे / ८०

११. महानुभावांचे पद्यवाङ्मयाचा परिचय
डॉ. विक्रम जाधव / ८६

१२. महाराष्ट्रातील मुस्लिम (सूफी) संप्रदाय
डॉ. पांडुरंग भोसले / ९३

१३. नागेश संप्रदाय
डॉ. सचिन सि. रुपनर / १००





१४. महाराष्ट्रातील ख्रिस्ती संप्रदाय
डॉ. वर्षा देसाई - रुपनर /१०७

१५. दत्त संप्रदाय
डॉ. संदीप वाकडे / ११२

१६. वीरशैव संप्रदायाचे स्वरूप व वाङ्मयीन कार्य
प्रा. बाळू तिखे / ११७

१७. वारकरी संप्रदायाचे स्वरुप
सौ. प्रमिला मनोहर भालके /१२४

१८. संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य : एक शोध
प्रा. डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील /१३३

१९. संत नामदेव : 'तीर्थावळी'चे अभंग
प्रा. गोविंद मुंढे /१३८

२०. संत नामदेवांची विठ्ठलभक्ती
डॉ. पौर्णिमा कोल्हे / १४४

२१. संत चोखामेळा : उपेक्षित, अस्वस्थ जाणिवेचा अविष्कार
प्रा. ज्ञानेश्वर अशोक तिखे / १४९

२२. महाराष्ट्राचे महान संत : चोखामेळा
डॉ. चंद्रकांत कांबळे / १५५

२३. संत सोयराबाई ह्यांच्या काव्य आणि अभंगाचे मूल्यमापन
डॉ. संदीप सांगळे /१६२

२४. वारकरी संप्रदायातील संत जनाबाईंची अभंगवाणी
डॉ. विकास बहुले /१७०

२५. संत एकनाथांच्या भारुडांमधील समाजदर्शन
डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम / १७९

२६. संत तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व
डॉ. शहाजी पाटील / १८६

२७. सर्वश्रेष्ठ : संत तुकाराम
डॉ. संजयकुमार सरगडे / १९२

२८. संत तुकारामांच्या अभंगातील समाजचिंतन
प्रा. डॉ. रमेश पोळ /१९६


MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

२९. संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक जाणिवा
डॉ. अमोल चांदेकर / २०१
३०. संत तुकारामांच्या अभंगातील विठ्ठल वर्णन व दृष्टांत
सौ. हर्षाली संदीप लोखंडे / २१२
३१. तुकाराम ते जगद्गुरु संत तुकाराम : एक दृष्टिक्षेप
डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात / २२०
३२. संत तुकारामांच्या अभंग वाङ्मयाचे विशेष
प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे /२२८
३३. अक्षर पंढरीचा वारकरी संताजी जगनाडे महाराज
डॉ. रामचंद्र मोरेश्वर वासेकर /२३६
३४. संत कवयित्रींच्या वाङ्मयातील माणूसपणाचे भान
प्रा. डॉ. सावली योगेश आचार्य / २४०
३५. संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन
डॉ. राजेंद्र खंदारे / २४९
३६. नैतिक मूल्यांची शिकवण देणारे संतसाहित्य
डॉ. बाबासाहेब शेंडगे /२५७
३७. वारकरी आभूषणे
प्रा. ज्ञानेश्वर भोसले / २६२
३८. स्वामी स्वरुपानंदांच्या 'स्वरुप पत्र मंजूषा' मधील नीतिबोध
डॉ. महेश सखाराम बावधनकर / २७२
३९. नाथ संप्रदायाचे स्वरूप आणि महाराष्ट्रातील परंपरा
प्रा. अमोल सुभाष कवडे / २८५
४०. समर्थ संप्रदायाचे साहित्य : स्वरूप आणि विशेष
प्रा. डॉ. रेश्मा रमेश दिवेकर / २९०
४१. समर्थ रामदास यांचे मनाचे श्लोक : एक आकलन
डॉ. पद्माकर दिगंबर वानखेडे / २९९
४२. समर्थ संप्रदायातील संत : वेणाबाई
डॉ. राजेंद्र सा. बावळे / ३०४
४३. महाराष्ट्रातील यादवकालीन भक्ती संप्रदाय
प्रा. संग्राम सीताराम गोसावी / ३०७



# १. संत मेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा

प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,
सातारा

महाराष्ट्राच्या संत परंपरेतील ज्ञानेश्वर माऊली व संत नामदेव या संतांनी महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक चळवळी अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला. तेराव्या शतकात क्षुद्र देवदेवतांचे पूजन, वर्णविषमता, कर्मकांड इ. गोष्टींमुळे समाजात सामान्य व्यक्तीच्या विकासाला पायबंद बसला होता. अशा परिस्थितीत संतांनी समाजाला स्वधर्म, सामाजिक नीती व मानवतेची शिकवण दिली. संत ज्ञानदेवांनी सांगितलेले तत्त्वज्ञान, संत नामदेवांनी समाजातील तळागाळापर्यंत पोहचविले. सर्व जाती-धर्मातील स्त्रिया व शूद्रांना वारकरी पंथात समाविष्ट करून घेतले. त्यांच्या आत्मिक विकासाला संधी प्राप्त करून दिली. विविध जातिधर्मातील संतांनी आपल्या मनातील वर्णभेदाचे दु:ख आपल्या अभंगामधून व्यक्त केले आहे. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा साध्या- सोप्या भाषेत वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान सांगितले. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सेनान्हावी, संत सावतमाळी, संत नरहरी सोनार, विसोबा खेचर, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई अशा अठरापगड जातीमधील संत एकत्र येऊन चंद्रभागेच्या तीरावर हरिनामाचा गजर करू लागले. यामधून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाला एक वेगळे वळण प्राप्त झाले. या आध्यात्मिक लोकशाहीला 'संतमेळा' असे म्हटले गेले. यासंदर्भात ल. रा. पांगारकर म्हणतात, ''ह्या वैष्णवांत पुरुष आहेत, स्त्रिया आहेत, ब्राह्मणेतर आहेत व अस्पृश्यही आहेत. ज्ञानी आहेत व केवळ भक्तीने मान्य झालेले साधेभोळेही आहेत. पण सर्वजण जातिकुलादिकांच्या अभिमानापलीकडे गेलेले आहेत. परमात्मासुखापुढे व परस्परप्रेमापुढे त्यांना इतर कसलीही आठवण नसे. सर्वांनी परस्परांचे अत्युत्कट प्रेम पडिभराने गौरव करावे व त्या गुणगौरवात डोलावे, सुखानंद द्यावा आणि घ्यावा असा त्यांचा ऱ्हदयाशय शुध्द होता.हे सर्व संत संसारी होते व हरीला सर्वस्व वाहिल्याने त्यांनी संसारच ब्रह्मरूप करून टाकला होता.''[1] अशा प्रकारे परमेश्वर, परमात्म्याच्या भक्तीमध्ये एकरूप झालेल्या संतमेळयाच्या अभंगातून प्रगल्भ स्वरूपाची

PHULE MAHAVIDYALAYA